**शिक्षण प्रसारक मंडळी**
शारदा सभागृह, स. प. महाविद्यालय आवार, पुणे.
दूरध्वनी क्रमांक : २४३३ १३१६ / २४३३ २०२९
दिनांक : २९.१२.२०२५

## मा. नियामक मंडळाचा पंचवार्षिक निवडणुकीचा कार्यक्रम

स. न. वि. वि.

शिक्षण प्रसारक मंडळीची घटना नियम क्र. २७ व २८ अन्वये सध्याच्या नियामक मंडळाच्या सदस्यांची पंचवार्षिक मुदत दिनांक २८ फेब्रुवारी, २०२६ रोजी संपत आहे. सबब नव्या नियामक मंडळाची निवडणूक करावयाची आहे. घटना नियम २५(अ) प्रमाणे नियामक मंडळावरील वीस सभासदांपैकी -

१) मंडळीचे सर्व सभासदांनी आपल्यातून बारा सभासद निवडावयाचे आहेत.
२) सदर बारा सभासदांपैकी कमीत कमी सात सभासद पुणे येथील कायम रहिवासी व कमीत कमी एक सभासद मुंबई येथील कायम रहिवासी व कमीत कमी एक सभासद सोलापूर येथील कायम रहिवासी असे असले पाहिजेत.
३) मंडळीच्या सक्रीय सेवेत असणाऱ्या कोणत्याही आजीव/प्रशासकीय मंडळ सभासदास वा सेवकास या निवडणुकीसाठी उमेदवार म्हणून उभे राहता येणार नाही.

नियम क्र. २५ (अ) अन्वये मा. नियामक मंडळावरील बारा जागांसाठी नामसूचनापत्रके/उमेदवारी अर्ज मागविण्यात येत आहेत. या करिता अधिकृत छापील नामसूचना पत्रकच/उमेदवारी अर्ज उपयोगात आणले पाहिजेत. सूचक व अनुमोदक हे दोघेही शिक्षण प्रसारक मंडळीचे सभासदच असले पाहिजेत. दिनांक ३१.१२.२०२५ अखेर पटावर असलेल्या शि. प्र. मंडळीच्या सर्व वर्गांच्या सभासदांची यादी अंतिम असेल.

## नियामक मंडळाच्या फेब्रुवारी २०२६ निवडणुकीचा कार्यक्रम

| दिनांक | वार | तपशील |
|---|---|---|
| २९/१२/२०२५ | सोमवार | सर्व सभासदांकडे कार्यक्रमपत्रिका पाठविणे - सभासद यादी शि. प्र. मंडळी कार्यालय, पुणे येथे २९/१२/२०२५ पासून उपलब्ध राहील. त्यामध्ये काही दुरूस्ती असल्यास दि. ३० डिसेंबर २०२५ ते ०५ जानेवारी, २०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत अर्ज करावा. |
| १२/०१/२०२६ | सोमवार | निवडणुकीचे नियम व नामसूचनापत्रके / उमेदवारी अर्ज व सभासदांची अंतिम मतदार यादी कार्यालयीन वेळेत (सुट्टीचे दिवस सोडून) सभासदांना पुढील ठिकाणी उपलब्ध होतील –<br>१) शि. प्र. मंडळीचे कार्यालय, शारदा सभागृह, स. प. महाविद्यालय आवार, पुणे ४११०३०<br>२) रामनारायण रुईया महाविद्यालय, माटुंगा, मुंबई - ४०००१९<br>३) प्रिं. के. पी. मंगळवेढेकर इन्स्टिटयूट, सोलापूर - ४१३००१<br>४) एस. पी. एम. इंग्रजी माध्यमाची शाळा, श्रीक्षेत्र परशुराम (चिपळूण)<br>(उमेदवारी अर्ज किंमत रु. १,०००/- सभासद यादी किंमत रु. ५,०००/-) |
| २०/०१/२०२६ | मंगळवार | नामसूचनापत्रके / उमेदवारी अर्ज सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत पुणे येथील मुख्य निवडणूक कार्यालय (शि. प्र. मंडळीचे कार्यालय, शारदा सभागृह, स. प. महाविद्यालय आवार, पुणे |

| | | |
|---|---|---|
| | | ४११०३०) येथे स्वीकारली जातील. त्यानंतर आलेल्या नामसूचनापत्रकांचा/उमेदवारी अर्जांचा विचार केला जाणार नाही. नामसूचनापत्रकांची / उमेदवारी अर्जांची छाननी, निवडणूक समितीतर्फे निवडणूक कार्यालयात सायंकाळी ५.०० वाजता केली जाईल व नंतर वैध नामसूचना पत्रकांची यादी शि. प्र. मंडळीच्या कार्यालयातील सूचना फलकावर लावण्यात येईल. |
| २७/०१/२०२६ | मंगळवार | उमेदवारी अर्ज सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत परत घेता येतील. अंतिम अधिकृत उमेदवार यादी सायंकाळी ६.०० वाजता शि. प्र. मंडळी कार्यालयातील सूचना फलकावर लावण्यात येईल. |
| ०३/०२/२०२६ | मंगळवार | पुणे, मुंबई व सोलापूर या **शहरांव्यतिरिक्त बाहेरगावी व परदेशी** राहणाऱ्या इतर सभासदांकडे मतपत्रिका पोस्टाने पाठवणे. |
| २२/०२/२०२६ | रविवार | सकाळी ८.०० ते दुपारी ५.०० पर्यंत पुणे, मुंबई व सोलापूर येथील सभासदांना त्या त्या ठिकाणच्या मतदान केंद्रावर जाऊन प्रत्यक्ष मतदान करता येईल. मतदान केंद्रे खालीलप्रमाणे असतील -<br>१) शि. प्र. मंडळी कार्यालय, सदाशिव पेठ, पुणे - ४११०३० (फक्त पुणे येथील सभासदांकरिता)<br>२) रा. आ. पोदार महाविद्यालय, माटुंगा, लखमसी नप्पू रोड, मुंबई- ४०००१९ (फक्त मुंबई येथील सभासदांकरिता)<br>३) प्रिं. के. पी. मंगळवेढेकर इन्स्टिटयूट, ह. दे. प्रशाला आवार, १५६-ब, रेल्वे लाईन्स, सोलापूर (फक्त सोलापूर येथील सभासदांकरिता)<br>बाहेरगावी राहणाऱ्या (पुणे, मुंबई व सोलापूर या शहरांव्यतिरिक्त) इतर सभासदांकडून मतपत्रिका सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत निवडणूक कार्यालय, शि. प्र. मंडळी, पुणे येथे स्वीकारण्यात येतील. सायंकाळी ५.०० नंतर आलेल्या मतपत्रिका ग्राह्य धरल्या जाणार नाहीत. |
| २३/०२/२०२६ | सोमवार | सकाळी ९.०० वाजता शि. प्र. मंडळी कार्यालय, सदाशिव पेठ, पुणे येथे मतमोजणीस सुरूवात केली जाईल व मतमोजणी पूर्ण झाल्यानंतर निवडणुकीचा निकाल जाहीर करण्यात येईल. |

सभासदांनी मतदानास येताना ओळखपत्र म्हणून शि. प्र. मंडळीने दिलेले सभासदत्वाचे ओळखपत्र, पासपोर्ट, ड्रायव्हिंग लायसन्स, आधार कार्ड, शासनाचे मतदान कार्ड यापैकी एक सोबत आणणे बंधनकारक आहे.

मा. नियामक मंडळाचे निवृत्त होणारे सदस्य नियमाप्रमाणे पुन्हा निवडणुकीस उभे राहण्यास पात्र आहेत. विद्यमान नियामक मंडळावरील निवृत्त होणाऱ्या सदस्यांची यादी आपल्या माहितीसाठी पुढे दिली आहे -

| | | |
|---|---|---|
| १. ॲड. एस. के. जैन | २. श्री. श्रीकृष्ण र. चितळे | ३. श्री. जयंत वि. किराड |
| ४. श्री. सतीश व. पवार | ५. श्री. केशव चिं. वझे | ६. श्री. राजेंद्र पटवर्धन |
| ७. श्री. राजेश पटवर्धन | ८. ॲड. मिहिर कृ. प्रभुदेसाई | ९. ॲड. दामोदर ब. भंडारी |
| १०. श्री. पराग ठाकूर | ११. श्री. सुधीर काळकर | १२. श्री . सुनील जोशी |
| १३. श्री. किरण शाळिग्राम (स्वीकृत सदस्य) | १४. श्री. विवेक नायक (स्वीकृत सदस्य) | |

(सौ. रमा कुलकर्णी)
चिटणीस, शि. प्र. मंडळी , पुणे